# मुंबई विद्यापीठ

**तात्काळ**
**माहिती अधिकार व विद्यार्थी**
**तक्रार निवारण कक्ष,**

क्र.आरटीआयसी/आयसीसी/२०१६-१७/३

दिनांक : २८, डिसेंबर, २०१६

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नियम ४(१)(बी) मध्ये सूचितकेल्यानुसार आपल्या विभागाची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत

संदर्भ :- १) परिपत्रक क्र.इएसटी/आयसीडी/२०१५-१६/२०२४ दि. २९/०१/२०१६
२) परिपत्रक क्र.इएसटी/आयसीडी/२०१६-१७/४४८, दि. ०३/०६/२०१६
३) पत्र क्र. रामाआ - तक्रार क्र. बीएम - ७८७/२०१५

परिपत्रक :-

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभागप्रमुख, प्रभारी ग्रंथपाल, वित्त व लेखाअधिकारी, प्रभारी परीक्षा नियंत्रक, प्रभारी प्राचार्य सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालय, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामग्री आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभाग/कक्ष प्रमुख, यांना वरील संदर्भीय परिपत्रकांन्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नियम ४ (१)(बी) मध्ये सूचितकेल्यानुसार विभागाची माहिती मुंबई विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत वेळोवेळी कळविण्यात आले होते. परंतू काही विभागांनी अद्यापर्यंत सदर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द/अद्ययावत केलेली नाही असे शासनाच्या व आयुक्तांच्या निदर्शनास आले आहे.

राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी वरील संदर्भीय पत्रान्वये दिलेल्या आदेशानुसार यु.सी.सी. मार्फत किंवा थेट विभागांमार्फत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द/अद्ययावत करण्यात आलेल्या माहितीबद्दल विभागनिहाय अहवाल आयोगास सादर करण्यास सांगितलेला आहे.तरी आपण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नियम ४(१)(बी) मध्ये सूचितकेल्यानुसार आपल्या विभागाची माहिती मुंबई विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दि. ०७/०१/२०१७ पर्यंत प्रसिध्द/अद्ययावत करावी जेणेकरून जेणे करून सर्व माहितीचे संकलन करून अहवाल आयोगास सादर करता येईल.

तसेच, सदर माहिती मुंबई विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द/अद्ययावत करण्यासाठी सिस्टीम ॲण्ड नेटवर्क मॅनेजर, विद्यापीठ संगणकीय केंद्र (U.C.C.), विद्यानगरी, मुंबई - ४०० ०९८ यांना (sanket@ucc.mu.ac.in) इमेलवर पाठविण्यात यावी व त्याची एक प्रत माहिती अधिकारी कक्षास (rtic713@gmail.com) इमेलवर अग्रेषित करावी.

डॉ. एम. ए. खान
कुलसचिव

मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २८/१२/२०१६

सोबत: वरीलप्रामाणे

प्रति,
विद्यापीठातील विभागाचे संचालक / विभाग प्रमुख,
सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल,
परीक्षा नियंत्रक, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,